ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २८ | पुणें, बुधवार तारीख ५ डिसेंबर, १९६२ | अंक २१

## विविध माहिती

**भारतीय वकिलातीसाठी जागा**—पाकिस्तानची नवी राजधानी इस्लामाबाद येथें परदेशीय वकिलातीच्या इमारतीसाठी जागा देण्यांत आल्या आहेत. आतांपर्यंत ९ देशांनीं कायम पट्ट्यानें जागा घेतल्या आहेत. त्यांपैकी सर्वांत अधिक म्हणजे १,१४००० चौरस वार जागा ब्रिटननें घेतली आहे. भारतीय वकिलातीसाठी ५१,८६६ चौरस वार जागा देण्यांत आली आहे.

**दुधाची सहकारी संस्था**—तंजावर सहकारी दूधपुरवठा संस्थेनें दूध निर्जंतुक करण्याची एक योजना तयार केली असून मध्यवर्ती सरकारनें तिला मान्यता दिली आहे. योजना अमलांत आणण्यासाठी १० लाख रुपये खर्च येणार आहे. त्यापैकी निम्मी रक्कम मद्रास सरकार मदत म्हणून देणार असून उरलेल्या रकमेचें कर्ज देण्यांत येणार आहे.

**स्मारकांसाठी दुर्मिळ धातूचा दुरुपयोग**—रशिअन कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीपुढें बोलतांना पंतप्रधान मि. कुश्चॉव्ह म्हणाले कीं, स्मारकें, रेल्वेस्थानकांवरील कलाकुसर इत्यादि कामासाठी तांब्यासारख्या महाग आयात वस्तूंचा रशिआंत दुरुपयोग करण्यांत येत आहे. लेनिन हयात असता तर त्यानें स्मारकांसाठी वापरलेलें तांबें परत मिळविलें असतें.

**आर्थिक बहिष्काराचें शस्त्र**—अमेरिकेंतील ज्या व्यापारी संस्था निग्रो लोकांविरुद्ध पक्षपात करतात त्यांच्यावर निग्रो लोकांनीं आर्थिक बहिष्कार घालण्याचा विचार चालू आहे. ह्या बहिष्काराच्या साह्यानें अशा संस्थांच्या नफ्यावर जबर धक्का पोंचविण्याचें सामर्थ्य निग्रो ग्राहकांत असल्याचें सांगण्यांत येत आहे.

**राजकीय पक्षांना देणग्या**—१९६१-६२ सालांत टाटा आर्यन अँड स्टील कंपनीनें कॉंग्रेसपक्षाला ४,३३,००० रुपये देणगी म्हणून दिले. नव्यानेंच स्थापन झालेल्या स्वतंत्र पक्षाला २,१७,००० रुपयांची देणगी देण्यांत आली. पुणें व बिहारमधील पूरग्रस्तांना मदत म्हणून २,२५,००० रुपयांची देणगी देण्यांत आली.

**कच्च्या साखरेची निर्यात**—पुढील वर्षी जपानच्या साखर कारखान्यांना भारताकडून ७८,००० टन कच्ची साखर पुरविण्यांत येणार आहे. ही निर्यात एका अमेरिकन कंपनीमार्फत करण्यांत येणार आहे. भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें वरील अमेरिकन कंपनीला तीन वर्षांत ३,००००० टन कच्ची साखर पुरविण्याचा करार केलेला आहे.

**पोलंडचें भारताला कर्ज**—भारत व पोलंड ह्यांच्या दरम्यान आर्थिक सहकार्याचा करार करण्यांत आला आहे. करारांतील शर्तींना अनुसरून पोलंड भारताला १५·५ कोटी रुपयांचें कर्ज देणार आहे. कर्जाचा उपयोग करून कोळशाच्या खोल खाणी व इतर औद्योगिक योजना हातीं घ्यावयाच्या आहेत. कर्जावरील व्याजाचा दर २॥ टक्के आहे. कर्जफेडीच्या हप्त्याचा उपयोग करून पोलंड भारतामधील माल विकत घेईल.

**कुटुंबनियोजनासंबंधीं चित्रपट**— कुटुंबनियोजनविषयीं उत्कृष्ट चित्रपट तयार करणाऱ्या निर्मात्याला व दिग्दर्शकाला दरसाल पारितोषिकें देण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. निर्मात्याला २०,००० रुपयांचें व दिग्दर्शकाला ५,००० रुपयांचें बक्षीस देण्यांत येईल. पारितोषिकाला पात्र ठरणारा चित्रपट १२ आठवडे दाखविण्यांत आलेला अगर राज्य सरकारनें बक्षीसपात्र ठरविलेला असला पाहिजे.

**मुंबई बंदरासाठी तरती यारी**—मुंबई बंदरांत वापरण्यासाठी एक प्रचंड तरती यारी जपानमध्यें तयार करण्यांत आली आहे. ह्या यारीचें वजन १२४ टन असून युद्धोत्तर कालांत अशा प्रकारची ही यारी प्रथमच तयार करण्यांत आली आहे. यारीचा प्रत्यक्ष ताबा भारतीय अधिकाऱ्यांनीं गेल्या महिन्यांत घेतला. लवकरच ती मुंबईला रवाना करण्यांत येईल.

**कोचीनचा बोटी बांधण्याचा कारखाना**—कोचीन येथें उभारण्यांत यावयाच्या बोट-बांधणीच्या दुसऱ्या कारखान्यासंबंधीं भारत सरकारशीं बोलणीं करण्यासाठी एका जपानी कंपनीचें तज्ज्ञमंडळ आलें आहे. कोचीन येथें कारखाना काढण्यासाठी जरूर त्या सोई आहेत कीं नाहींत ह्याची तपासणी मंडळ करणार आहे. कारखान्यासंबंधींचा ब्रिटिश तज्ज्ञांचा अहवाल तयार झालेला आहे. परंतु जपानी तज्ज्ञांच्या अहवालांत परदेशीय चलन कमी लागण्याचा संभव आहे.

**चीनच्या निर्यातींत घट**—१९५९ सालीं चीन रशिआला जितक्या शेतीच्या मालाची निर्यात करीत होता त्याच्या एकदशांशहि निर्यात त्याला १९६१ सालीं करतां आलेली नाहीं. गेलीं चार वर्षे प्रतिकूल हवामानामुळें चीनच्या शेतीच्या उत्पादनांत फार मोठी घट झाली आहे. त्यामुळें रशिआला माल निर्यात करून चीनला शेतीचीं अवजारें आयात करणें जवळ जवळ अशक्य झालें आहे.

## परदीप बंदरांच्या विकासाची योजना

ओरिसा राज्यांतील परदीप बंदराचा विकास करण्याचें काम हातीं घेण्याचें आतां निश्चित झालें आहे. विकासाच्या योजनेसाठी ३५ कोटी रुपये खर्च येणार आहे. हें काम मध्यवर्ती सरकारच्या वतीनें ओरिसा राज्यसरकारच करण्याचा संभव आहे. बंदराच्या विकासाचें काम पार पाडण्यासाठी जपानी तज्ज्ञांची मदत घेण्यांत येणार आहे. १८ जपानी तज्ज्ञांचें एक मंडळ लवकरच भारतांत येणार असून कामाची प्राथमिक पाहणी करण्यास सुरुवात करणार आहे. परदीप बंदराचा विकास करण्याच्या कामांत जपानचें सरकार व जपानमधील पोलादाचे कारखानदार बरेंच लक्ष घालीत आहेत. ह्या कामाखेरीज लोखंड व कोळशाच्या साह्यानें चालविण्यांत येण्यासारखे नवे धंदे काढण्याच्या कामींहि जपानचें साह्य मिळणार आहे. परदीप बंदराच्या विस्ताराचें काम पूर्ण झाल्यावर १९६५ पासून त्यामधून दरसाल २० लाख टन अशुद्ध लोखंड जपानला निर्यात करण्यांत येईल.

---

## शेतकी पदवीधरांची वाढती गरज

रांची येथें अखिल भारतीय शेती-शिक्षण संघटनेची ६ वी परिषद् भरविण्यांत आली होती. परिषदेचें उद्घाटन करतांना मध्यवर्ती सरकारचे शेती-मंत्री श्री. राम सुभानसिंग म्हणाले, कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत भारताला २०,००० शेतकी पदवीधरांची जरुरी आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत तर त्याहीपेक्षा अधिक, म्हणजे ३०,००० शेतकी पदवीधरांची जरूर लागणार आहे. शेतीबाबत संशोधन करण्यासाठी आणि पदवीनंतरच्या अभ्यासासाठी एक केंद्र स्थापन करण्याची फार आवश्यकता आहे. बिहारचे शेतकीमंत्री श्री. बीरचंद पटेल ह्यांनीं अशी सूचना केली कीं, शेतीच्या पदवीधरांची जरुरी वाढत असल्यानें माध्यमिक शाळांत शेती हा विषय ठेवावा.

## भारत व रशिया यांच्यामधील व्यापार

भारत व रशिया ह्यांच्या दरम्यान होणारा व्यापार १९६२ सालांत झालेल्या व्यापाराच्या मानानें १९६३ सालीं २५ टक्के वाढण्याचा संभव आहे. १९६३ सालीं १०० कोटी रुपयांचा व्यापार होईल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. उभयतां देशांत व्यापारवाढीसंबंधीं एक करार नुकताच करण्यांत आला आहे. १९६१ सालीं उभयतां देशांत ५६ कोटी रुपयांची व्यापारी देवघेव करण्यांत आली होती. १९६२ ची व्यापारी देवघेव ८० कोटींच्या घरांत जाईल असें दिसत आहे. भारत रशियाकडून कच्चा अॅस्बेसटॉस, कागद करण्यासाठी लागणारा लगदा, विशेष प्रकारचें पोलाद, रासायनिक खतें व पेट्रोलचे पदार्थ ह्यांची आयात करणार आहे. रशिया भारताकडून सुती व लोकरी कापड, कातड्याचीं पायतणें, काथ्याचा माल, लिनोलियम, इत्यादि माल घेणार आहे.

---

## सागरी वाहतुकीसाठी नवीन बोट


भारताचे अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई ह्यांनीं सागरी वाहातुकीसाठी जपानकडून घेण्यांत आलेल्या एका बोटीचा जलवितरण-समारंभ केला ही बोट जयंती शिपिंग कॉर्पोरेशननें खरेदी केली असून ती भारताच्या व्यापारी वाहातूक करणाऱ्या बोटींतील सर्वांत मोठी आहे. तिचें वजन ३२,२५० टन आहे. जपानच्या मिटसुबीशी कंपनीनें ती नागासकी येथील आपल्या कारखान्यांत बांधली. जयंती शिपिंग कॉर्पोरेशननें अशाच आकाराच्या आणखी ८ बोटींची मागणी वरील जपानी कंपनीकडे नोंदविली आहे. जपानकडून आणखीहि कांहीं बोटी बांधवून घेण्याचा भारत सरकारचा इरादा आहे. मिटसुबिशी शिपिंग कंपनीकडून ५२,००० टन वजनाची एक तेलवाहू बोट बांधवून घेण्यासाठी जयंती कॉर्पोरेशन लवकरच करार करणार आहे. बोट बांधून झाल्यावर ती एसो कंपनीला भाड्यानें देण्यांत येईल.


बँक ऑफ महाराष्ट्राची

# रिकरिंग डिपॉझिट स्कीम

तुम्हांला शिल्लक टाकणें सोपें जावें व व्याजही भरपूर मिळावे अशी एक योजना महाराष्ट्र बँकेनें तयार केली आहे. **रिकरिंग डिपॉझिट स्कीम**—या खात्यांत आपण दरमहा १० रु. अगर १०च्या पटींत ५०० रुपयापर्यंत कितीहि रक्कम २ वर्षे भरावयाची. दुसऱ्या वर्षाच्या शेवटीं आपल्या खात्यावर ४ टक्के व्याजानें मोठी रक्कम जमा झालेली दिसेल.

दरमहा जी रक्कम आपण ठरवूं तेवढीच नियमितपणें २ वर्षे टाकावयाची. उदा. रु. १०/- महिना रिकरिंग डिपॉझिट खात्यांत टाकले तर २ वर्षांच्या शेवटीं आपणांस रु. २५०/- मिळतील. या बचतीचा उपयोग आपल्याला कितीतरी चांगल्या गोष्टींसाठीं करितां येईल.



४ टक्के व्याजाची नवीन योजना

तुमचे पैसे कसे वाढतात तें पहा

| मासिक बचत | २४ महिन्यानंतर मिळणारी रक्कम |
|---|---|
| १० | २५० |
| २० | ५०० |
| ३० | ७५० |
| ४० | १,००० |
| ५० | १,२५० |
| ६० | १,५०० |
| १०० | २,५०० |
| २०० | ५,००० |
| ३०० | ७,५०० |
| ४०० | १०,००० |
| ५०० | १२,५०० |

मोफत माहिती पत्रकासाठीं लिहा अगर बँकेच्या शाखेंत येऊन भेटा.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

• मुख्य कचेरी • थोरले बाजीराव रस्ता, पुणें-२

Pratibha-62-S

अर्थ

बुधवार, ता. ५ डिसेंबर, १९६२



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## कर्जे वापरण्यावरील अटी रद्द करा

कम्युनिस्ट चीननें ता. २० आक्टोबरला भारताच्या उत्तर सरहद्दीवर आक्रमण सुरू केल्यापासून भारताच्या अर्थव्यवस्थेत संरक्षणासाठी लागणाऱ्या उत्पादनाला साहजिकच प्राधान्य देण्यांत येऊं लागलें आहे. भारतानें औद्योगिक प्रगति साधण्यासाठी निरनिराळ्या देशांकडून कर्जे घेतलेलीं आहेत. हीं कर्जे विशिष्ट औद्योगिक प्रकल्प पार पाडण्यासाठी दिलेलीं असल्यानें त्यांचा विनियोग दुसऱ्या कामासाठी करतां येत नाहीं. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील दुसऱ्या वर्षासाठी भारताला कांहीं मित्र-राष्ट्रांनीं कर्जे देऊं केलेलीं आहेत. ह्या कर्जांपैकीं कांहीं हिस्सा कर्जांच्या वापराच्या अटींपासून मुक्त असावा अशी मागणी भारत संबंधित धनको राष्ट्रांकडे करणार आहे. भारताच्या संरक्षणासाठी लागणारें उत्पादन वाढविण्यासाठी औद्योगिक कच्चा माल व यंत्रसामग्रीचे सुटे भाग अधिक प्रमाणांत आयात करावे लागणार आहेत. अमेरिकेनें तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या दुसऱ्या वर्षासाठी ४३·५ कोटी डॉलर्सचें कर्ज देण्याचें कबूल केलेलें आहे. त्यांपैकीं २२ कोटी डॉलर्सचें कर्ज मुक्त वापरासाठी देण्याचें अमेरिकेनें मान्य केलें आहे. भारताच्या संरक्षणात्मक तांतडीच्या गरजा भागविण्यासाठी आता ह्या मुक्त कर्जाचा उपयोग करण्यांत येत आहे. संरक्षणासाठी लागणाऱ्या वस्तूंचें उत्पादन करण्यासाठी इंजिनिअरिंगचे बरेच कारखाने कामास लावण्यांत येत आहेत. खाजगी मालकीचे व सार्वजनिक मालकीचे यांत्रिक हत्यारांचे कारखाने तीन पाळ्यांनीं चालविण्यांत येऊं लागले आहेत. जिप्स व मालवाहू मोटारी ह्यांचें उत्पादन वाढविण्यांत येणार आहे. जमशेटपूर येथील मोटारींचा कारखाना ह्या बाबतींत आघाडीवर आहे.

---

## ब्रिटनकडे जाणाऱ्या निर्यातींत घट

परदेशांत माल निर्यात करून परदेशीय चलन मिळविण्याची भारताची गरज कधींच न संपणाऱ्या स्वरूपाची आहे, असें म्हटल्यास फारसें चूक होणार नाहीं. त्यांतहि ब्रिटनकडे पाठविण्यांत येणाऱ्या निर्यातीला वेगळें महत्त्व आहे. १९६१ च्या पहिल्या ९ महिन्यांत म्हणजे जानेवारीपासून सप्टेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत भारतानें ब्रिटनला जितका माल निर्यात केला त्या मानानें १९६२ च्या पहिल्या ९ महिन्यांत केलेली निर्यात कमी आहे असें आढळून आलें आहे. १९६१ च्या मध्यापासून ब्रिटनमध्यें ग्राहकांच्या उपयोगाच्या वस्तूंची मागणी कमी झाल्यानें ही घट झालेली आहे. निर्यात मालासंबंधींचे कांहीं आकडे पुढीलप्रमाणें आहेत. १९६२ च्या पहिल्या ९ महिन्यांत ब्रिटननें भारताकडून ७७ लाख पौंड किंमतीचें सुती व इतर प्रकारचें कापड आयात केलें. १९६१ साऴच्या पहिल्या ९ महिन्यांच्या काळांत ब्रिटननें १·०७ कोटी पौंड किंमतीचा ह्याच प्रकारचा माल आयात केला होता. कमावलेलीं कातडीं व त्यापासून केलेल्या वस्तूंच्या ब्रिटनच्या आयातींतहि अशीच घट झालेली आहे. १९६१ च्या वरील काळखंडांत ब्रिटननें ९० लाख पौंड किंमतीचा कातड्याचा माल आयात केला होता. १९६२ च्या ह्याच काळांत अवघा ८० लाख पौंड किंमतीचा माल आयात करण्यांत आला. चहाचे आंकडे पुढीलप्रमाणें आहेत. १९६१ मध्यें ४·१२ कोटी पौंड; १९६२ सालांत ३·६ कोटी पौंडांचा चहा आयात करण्यांत आला. तथापि ब्रिटनमधील रोजखपाच्या मालाची मागणी हळूहळू वाढत चाललेली असून १९६२ च्या संपूर्ण वर्षाचे आंकडे कमी असमाधानकारक होण्याची शक्यता आहे.

---

## आवडी येथील रणगाड्यांचा कारखाना

भारतावर चीननें आक्रमण केल्यामुळें लष्करी महत्त्वाच्या उत्पादनाला जोराची चालना मिळाली आहे. मद्रास राज्यांत आवडी येथें रणगाडे तयार करण्याचा कारखाना उभारण्याचें भारत सरकारनें आक्रमण होण्यापूर्वींच ठरविलें होतें. आतां ह्या योजनेला साहजिकच अधिक महत्त्व प्राप्त झालें आहे. भारताच्या संरक्षण-उत्पादन-खात्याचे मंत्री श्री. रघुरामय्या ह्याबाबत माहिती देतांना लोकसभेंत म्हणाले कीं, मद्रास येथील संकल्पित रणगाड्यांच्या कारखान्यांत १९६५ च्या सुमारास मध्यम वजनाच्या रणगाड्यांचें उत्पादन होऊं लागेल असा अंदाज आहे. ब्रिटनमधील सुप्रसिद्ध व्हिकर्स आर्मस्ट्रॉंग ह्या कंपनीचें सहकार्य मिळविण्यांत आलें आहे. कंपनीकडे कारखान्याच्या उभारणीसाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीची मागणी नोंदविण्यांत आलेली आहे. बहुतेक सामग्री ह्याच कंपनीकडून घेण्यांत येणार असून तिची किंमत सुमारें ४·७ कोटी रुपये होईल. १९६४ च्या सुमारास कंपनीकडून यंत्रसामग्री मिळेल आणि त्यानंतर १९६५ मध्यें रणगाड्यांच्या उत्पादनास प्रारंभ करण्यांत येईल. रणगाड्यांना लागणारे सर्व भाग आवडी येथील कारखान्यांतच बनविण्याचा सरकारचा विचार आहे. शक्य तर आवडी येथील कारखाना स्वयंपूर्ण करण्यांत येईल. तथापि, देशाच्या इतर भागांत कारखान्याला पोषक असे कारखाने काढण्यांत येणारच नाहींत असें नाहीं. कारखान्यांत काम करण्यासाठी लागणारे कुशल कामगार शिकवून तयार करण्याचें काम आवडी येथील तांत्रिक शिक्षण-संस्थेंत चालू आहे. सध्यां १०० कामगारांना शिक्षण देण्यांत येत आहे.

---

## अमेरिकन धनिकाचा मृत्यु

अमेरिकेंतील एक कोट्याधीश मि. आर्थर डेव्हिस हा आपल्या वयाच्या ९५ व्या वर्षी निधन पावला. त्याची मालमत्ता ३५ कोटी डॉलर्स इतकी असावी असा अंदाज करण्यांत आला आहे. आपल्या धनसंचयाबद्दल मि. डेव्हिस कधींच माहिती देत नसे. पण एका खान्याच्या प्रसंगीं, अमेरिकेंतील दुसऱ्या अगर तिसऱ्या क्रमांकाचा धनिक असा त्याचा उल्लेख कोणीतरी केला. त्यावर आपला क्रमांक ५ वा असल्याचें त्यानें सांगितलें.

### युरोपीय सामायिक बाजारपेठेचे हेतु

पश्चिम जर्मन सरकारचे परराष्ट्रमंत्री डॉ. गेरहार्ड श्रोडर ह्यांनीं दिल्ली येथें एका पत्रकार परिषदेंत बोलतांना, युरोपीय सामायिक बाजारपेठ स्थापन करण्यासंबंधीच्या हेतूवर प्रकाश टाकला आहे. ते म्हणाले कीं ह्या बाजारपेठेंत ब्रिटननें सामील व्हावें असें पश्चिम जर्मन सरकारला वाटतें ही गोष्ट खरी आहे. तथापि, ह्याचा अर्थ राष्ट्रकुल गटांतील देशांच्या पुढें असलेल्या विशिष्ट प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्यांत येईल असा नाहीं. ब्रिटन बाजारपेठेंत सामील झाल्यावर तीन महिन्यांच्या कालावधींत भारत, पाकिस्तान व सीलोन ह्यांच्याबरोबर होणाऱ्या व्यापारासंबंधीं वाटाघाटी सुरू करण्यांत याव्या असें ठरविण्यांत आलें आहे. बाजारपेठेंत सामील होणाऱ्या देशांचा गट म्हणजे श्रीमंत राष्ट्रांचा एक क्लब आहे असें मानण्याचें कारण नाहीं. आर्थिक विकासाचें व भरभराटीचें क्षेत्र शक्य तितकें वाढावें म्हणून ही संघटना उभारण्यांत येत आहे. ही संघटना संरक्षणवादी नाहीं; कारण तिचा उद्देश व्यापार वाढविण्याचा आहे. किंवा संघटना म्हणजे एक नवीन प्रकारचा वसाहतवाद आहे असेंहि नाहीं. कारण, अविकसित देशांनीं नेहमीं मागासलेलेंच राहावें असें संघटनेला वाटत नाहीं. पश्चिम युरोपांतील देशांचें आर्थिक एकीकरण करून त्यांच्यामधील स्पर्धा थांबविणें आणि संघटनेंतील देशांना परस्परांशीं युद्ध करणें अशक्य करणें हा संघटनेचा पहिला हेतु आहे. युरोपच्या एकीकरणामुळें बाजारपेठेंत सामील झालेल्या देशांतील लोकांचा राहणीचा दर्जा आणखी सुधारण्यास मदत होईल. त्याचा एक चांगला परिणाम असा होईल, कीं भरभराटीचें जीवन जगण्यासंबंधींची कम्युनिझमच्या प्रचाराची धार बोथट होईल. त्यामुळें पश्चिमयुरोपांतील लोक कम्युनिस्टांच्या जाळ्यांत फसणार नाहींत.

---

### रशियांत उत्पादन वाढविण्यासाठी सुधारणा

रशियाच्या अर्थव्यवस्थेंत शेतीचें उत्पादन हा अजूनहि एक कच्चा दुवा आहे. पंतप्रधान मि. क्रुश्चॉव्ह ह्यांनीं सायबेरियांतील पडीक जमीन लागवडीस आणण्याचा मोठा कार्यक्रम आखला व गेलीं कांहीं वर्षें तो अमलांतहि आणला जात आहे. तरी सुद्धां शेतीच्या उत्पादनांत व्हावी तशी वाढ झालेली नाहीं. रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या नुकत्याच झालेल्या अधिवेशनांत मि क्रुश्चॉव्ह ह्यांनीं अशी सूचना केली कीं उद्योगधंदे व शेती ह्यांच्याकडे लक्ष देण्यासाठी पक्षाच्या संघटनेचे दोन भाग करण्यांत यावे. रशियन अर्थव्यवस्थेचा सर्व कारभार मॉस्कोमधील प्रचंड नोकरशाहीमार्फत चालविण्यांत येत असतो. त्यामुळें होणारें कारभाराचें केंद्रीकरण मि. क्रुश्चॉव्ह ह्यांना पसंत नव्हतें. म्हणून १९५७ मध्यें त्यांनीं रशियामध्यें प्रादेशिक नियोजन आणि कारभारपद्धति अस्तित्वांत आणली. तेव्हांपासून मॉस्कोमधील वरिष्ठ नोकरांना फारसें न विचारतां १०० पेक्षा अधिक प्रादेशिक कारभारमंडळें कारखाने व शेती ह्यांचा रोजचा कारभार पाहूं लागलीं. त्यामुळें रशियाच्या सर्वंकष योजनेकडे लक्ष न देता जो तो प्रादेशिक विभाग आपल्या पुरतें पाहूं लागला. आतां अशा प्रादेशिक विभागांची संख्या कमी करून ती ४० करावी अशी सूचना करण्यांत आली आहे. मात्र ह्या संकल्पित विभागांना आपल्या भागापुरतें विकेंद्रित आर्थिक नियोजन करण्याचे अधिकार देण्यांत आले आहेत. आर्थिक नियोजनाची अंमलबजावणी बरोबर होत आहे कीं नाहीं हें पाहण्यासाठी सार्वजनिक सेवा स्वच्छेनें करणारांची मदत घेण्यांत येणार आहे. रशियांतील सरकारी नोकर व पक्षाचे सभासद ह्यांच्यावरच आतांपर्यंत ही जबाबदारी होती.


## दी बेळगांव बँक लि.

शेड्यूल्ड बँक ] ◆ [ स्थापना : १९३०

रजिस्टर्ड ऑफिस : बेळगांव

◆

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ८,००,००० |
| ठेवी | रु. | २,१२,००,००० |
| खेळतें भांडवल | रु. | २,३०,००,००० |

आपल्या ह्या बँकेची सुरक्षितता, मजबुती आणि सेवाभाव ह्याबद्दल ख्याति कां आहे, ह्याचें रहस्य प्रगतीचे हे आंकडेच स्पष्ट करतील.

बँकेच्या २८ शाखांपैकी कोणत्याहि शाखेंत या आणि आपल्या सेवेची आम्हांला संधि द्या!

**बचत, हीच आजची गरज!**

बी. बी. पोतदार, बी. ए., एलएल. बी. चेअरमन

ए. आर. नाईक, बी. ए., बी. एस्सी., एलएल. बी. मॅनेजिंग डायरेक्टर

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ता:–युवरबँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :–०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :–३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष–४¼ टक्के, २ वर्षें–४½ टक्के, ३ वर्षें–४¾ टक्के, ४ वर्षें–५ टक्के, ५ वर्षें–५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युमिलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा–विस्तार

शाखा–१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंबज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| गंगाजळी | रु. | ५,६६,००० |
| ठेवी | रु. | ३,३७,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ३,५०,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम., जनरल मॅनेजर.

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. चेअरमन.

# संरक्षणासाठी सोनें कां हवें ?

लेखक : श्री. प्रवीणचन्द्र व. गांधी
प्रमुख : इन्डियन मर्चण्ट्स चेम्बर, मॅनेजिंग डिरेक्टर, देना बँक.

भारत सरकारच्या त्याचप्रमाणें देशांतील सर्व जनतेच्या ठाम निर्धाराची अंमलबजावणी करण्यासाठी जें पाऊल टाकणें आवश्यक आहे, त्यांतल्यात्यांत आपल्या सैन्याला आधुनिक शास्त्रसामग्रीनें सज्ज करणें ही गोष्ट मुख्य आहे. आपल्या देशांत शस्त्रसामग्रीचें पुरेसें उत्पादन होत नाहीं म्हणून परदेशांतून ती मिळविल्याशिवाय गत्यंतर नाहीं. ज्या देशांतून आपण शस्त्रें विकत घेतों, त्या देशाच्या चलनांतच त्यांची किंमत चुकवावी लागते. अद्ययावत् शस्त्रें पुरत्या संख्येंत मिळविण्यासाठी पांच-पंचवीस हजार रुपयांची नव्हे परंतु कोट्यवधि रुपयांची, आणि ती पण परदेशी चलनांत जरूर लागते. ह्या बाबतींत सामान्य परिस्थितींत सुद्धां देशाची स्थिति फार कठीण आहे.

परदेशी चलनाची शिल्लक जवळजवळ ९४ कोटी रुपयांइतकी खाली गेली आहे. आपल्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ५७५० कोटी रुपयांची परदेशी चलनाची आवश्यकता राहील, असें गणित मांडलें गेलें आहे. जास्तींत जास्त निर्यात करून मिळणाऱ्या परदेशी चलनांचा उपयोग आपण जरूर करूं शकतों. परंतु आपले उद्योगधंदे चालू ठेवण्यासाठी लागणाऱ्या सामग्रीची आवश्यकता इतकी मोठी आहे, कीं त्यासाठी ह्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ३७०० कोटी रुपयांची निर्यात होण्याची जरुरी आहे. निर्यात व्यापाराचा विकास अविश्रांत प्रयत्न करूनसुद्धां मांडलेल्या गणिताप्रमाणें झाला नाहीं हें सुविदित आहे. सामान्य परदेशी चलनाच्या साठ्यांतून पैसे घेऊन आपण शस्त्रसामग्री विकत घेऊं शकूं ही कल्पना उराशीं बाळगणें अशक्य आहे.

देशाच्या रक्षणासाठी शस्त्रसामग्री विकत घेणें हें ह्या प्रसंगीं अनिवार्य आहे. त्याचबरोबर हेंहि सत्य आहे कीं शस्त्रें विकत घेण्यासाठी लागणारें परदेशीय चलन आपल्या देशाकडे नाहीं. हा प्रश्न सोडविण्याचा फक्त एकच मार्ग आहे, आणि तो म्हणजे आपल्याकडे एक अशी वस्तु भरपूर प्रमाणांत असावी कीं शस्त्रें देणारें कोठलेंहि राष्ट्र आपल्या स्वतःच्या चलनांत रोख पैसे घेण्याऐवजीं तिचा स्वीकार करण्यास तयार होईल. सोनें ही अशी एकच वस्तु आहे कीं, जगांतील सर्व देशांत देशाची अमोल संपत्ति म्हणून ज्याची गणना होते. कारण कीं, त्याचें कोठल्याहि परदेशी चलनांत रूपांतर होऊं शकतें आणि म्हणून परदेशी चलनाच्या मदतीनें विकत घेतलेल्या वस्तूच्या किंमतीची तें भरपाई करूं शकतें.

आपल्या देशांत ह्या सोन्याच्या संपत्तीचा मोठा सांठा पडलेला आहे. दुसऱ्या राष्ट्रांतसुद्धां त्यांचे मोठे सांठे आहेत, परंतु आपल्या देशाच्या आणि त्या देशाच्या ह्या बाबतींतील परिस्थितींत एक मोठा फरक आहे. दुसऱ्या देशांत हा सांठा बहुधा सरकारच्या हातांत राष्ट्रीय संपत्ति म्हणून राहतो, परंतु आपल्या देशांत तो जनतेच्या हातांत विखरून पडलेला आहे.

आपल्या देशांत जवळजवळ ४५०० कोटी रुपयांचा सोन्याचा सांठा निष्क्रीय पडलेला असेल, असा अंदाज आहे. शेंकडों वर्षांपासून सोनें हें भारताच्या प्रजाजनांच्या धार्मिक आणि सामाजिक भावनांबरोबर सांधलें गेलें आहे. धार्मिक प्रसंगीं आणि कौटुंबिक प्रसंगीं सोनें देणें ही प्रथा होऊन बसली आहे. लग्नसमारंभासारख्या सामाजिक प्रसंगीं सोन्याचे दागिने कुटुंबाच्या सामाजिक दर्जाचे मानदंड होतात. हा व्यवहार इतका रूढ झाला आहे कीं, आपल्याला ह्या उद्देशासाठी सोन्याच्या प्रमाणशीर उपयोगाला मान्यता द्यावीच लागेल; परंतु ह्या रीतीनें होणारा सोन्याचा उपयोग, देशांतील एकत्रित झालेल्या सोन्याच्या मोठ्या सांठ्याचें एकमेव कारण नाहीं. ह्या मागील खरें कारण असें आहे कीं, देशांतल्या सर्वसामान्य गरीब व निरक्षर लोकांत अशी समजूत पसरलेली आहे कीं, बचत केलेले पैसे सोन्यामध्यें गुंतवलें असतां सुरक्षित राहतील. बचत केलेल्या पैशांची गुंतवणूक अधिक फायदेशीर रीत्या व कोणतेहि जोखीम न घेतां करतां येते ही गोष्ट लोकांच्या मनावर ठसण्याकरितां कांहीं वर्षांपासून सक्रीय प्रयत्न होतच आहेत. परंतु रूढ झालेल्या प्रथेवर त्याचा पाहिजे तितका परिणाम झाला नाहीं.

ह्या व्यतिरिक्त गेल्या कित्येक वर्षांपासून असा एक वर्ग अस्तित्वांत आला आहे आणि त्याशिवाय समाजाच्या प्रत्येक व्यवसायांत अशा व्यक्ति सांपडतील कीं ज्या आयकर चुकविण्यासाठी किंवा अशा दुसऱ्या कोठल्याहि स्वहितकारी कारणामुळें स्वतःची आवक जाहीर करीत नाहींत आणि अशा प्रकारें जाहीर न झालेल्या पैशांतून सोनें विकत घेऊन तें सांठवितात.

देशांत सोन्याचा मोठा सांठा पडलेला आहे. आपल्या मर्यादित पैसेरूपी साधनांचा उपयोग आर्थिक प्रगतीसाठी व्हावा, ह्या कारणास्तव सोन्याच्या आयातीवर पुष्कळ वर्षांपासून निर्बंध घातले आहेत, परंतु वर सांगितलेल्या त्रिविध कारणामुळें देशांत सोन्याची मागणी वाढतच राहिली आणि त्यामुळें सोन्याचे भाव वाढतच राहिले. वस्तुतः ते सोन्याच्या आंतरराष्ट्रीय भावापेक्षा दुप्पट झाले. ह्या परिस्थितींत देशांत मोठ्या प्रमाणांत जकात चुकवून सोनें चोरून आणलें जाई. कारण तसें करण्यांत मनुष्य जर पकडला गेला नाहीं तर पैशाचा मोठा फायदा त्याला मिळतो.

देशांतील सोनेंविषयक परिस्थिति सुधारण्यासाठी सरकार सतत सचिंत राहिलेले आहे, आणि विशेषतः जकात चुकवून चोरून आणलेलें सोनें आणि त्यांत इतक्या प्रमाणांत परदेशी चलनांच्या सांठ्याच्या टाळण्याजोगा खर्च अडविण्यासाठी पवित्रे घेत आहे. आणि जास्त परिणामकारक पवित्रे घेण्याचा विचार करीत आहे. त्या कार्यामध्यें प्रत्येक प्रजाजनानें संपूर्ण सहकार्य दिलें पाहिजे.

देशांत जो सोन्याचा सांठा पडलेला आहे, त्याचा देशासाठी उपयोग होऊं देणें हें सुद्धां ह्या परिस्थितींत आपलें पवित्र कर्तव्य ठरतें. सर्वसाधारण परिस्थितीसुद्धां ह्या देशाचा आर्थिक विकास झपाट्यानें करण्यासाठी आवश्यक आयातीमागें खर्च करण्यासाठी परदेशी चलनाची जी टंचाई देशाला पडते ती दूर करण्यांत सोन्याचा हा सांठा कोठल्याहि प्रकारें उपयोगांत आणतां आला असता, परंतु कोणत्याहि कारणामुळें ह्या देशांत त्या दिशेनें आजवर पवित्रे घेतले गेले नव्हते.

परंतु जेव्हां देशासमोर चिनी आक्रमणाचा आणीबाणीचा प्रसंग उभा राहिला आहे तेव्हां देशाच्या संरक्षण निधींत सोनें व सोन्याच्या दागिन्यांचा आपला वांटा देऊन देशांतील प्रत्येक प्रजाजनाला मातृभूमीवरील प्रेमाला मूर्तिमंत स्वरूप देण्याचें सरकारनें जें आवाहन केलें आहे त्याचा आपण स्वीकार केला पाहिजे.

सरकारला सोन्याची इतक्या मोठ्या प्रमाणांत आवश्यकता आहे, कीं प्रजेकडून मिळणाऱ्या सोन्याच्या वांट्यावरच केवळ अवलंबून राहतां येत नाहीं; आणि म्हणूनच प्रत्येक व्यक्ति स्वतःचा सोन्याचा सांठा सुलभतेनें ह्या काळांत देशाच्या उपयोगासाठी देऊं शकेल. त्यासाठी सरकारनें एक आकर्षक योजना

अस्तित्वांत आणून ती अमलांत आणली आहे. ही योजना म्हणजे ' गोल्ड बॉन्डस्– सुवर्णरोखे '. ह्या रोख्यांत सोनें गुंतवणाऱ्या कडून सोन्याच्या आंतरराष्ट्रीय दरानें म्हणजेच प्रत्येक तोळ्यासाठी ६२·५ रुपये किंवा १० ग्रॅमचे रुपये ५३·५८ हा भाव देऊन सरकार सोनें विकत घेईल. ह्या रोख्याची मुदत १५ वर्षांची आहे आणि त्यासाठी ६½% व्याज देण्यांत येईल. शिवाय ह्या रोख्याच्या रकमेवर "वेल्थ–टॅक्स" ( संपत्ति कर ) आणि "कॅपिटल गेन्स-टॅक्स" ( भांडवलाच्या फायद्यावरील कर ), लागू पडणार नाहीं. ह्यासाठी व्याजाचा जो दर ठरविण्यांत आला आहे. तो दर अशा सरकारी कर्जाच्या व्याजापेक्षा २% जास्त आहे म्हणून आंतरराष्ट्रीय दरानें आतां सोनें दिलें जाईल, तरीसुद्धां दिर्घकाळांत कांहीं गैरफायदा होण्याचा संभव नाहीं. कारण आतांसुद्धां क्रियाशून्य पडून राहिलेल्या सोन्यांतून कांहीं आवक होत नाहीं म्हणून सुवर्णरोखे घेतल्यानें दिर्घकाळानंतर व्याजासकट जी मुद्दलाची रक्कम मिळेल ती हल्लींच्या सोन्याच्या भावाच्या मानानें विशेष कमी आकर्षक नाहीं. ह्या खेरीज, ह्या रोख्यांची खरेदी-विक्री शेअर-बाजारांत होऊं शकेल.

---

### विद्युत्-केंद्रासाठी आर्थिक मदत

अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय विकास संघटनेतर्फे भारताला २॥ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर करण्यांत आलें आहे. मध्यभारतामधील दोन राज्यांच्या औद्योगिक दृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या भागांत उष्णतेच्या साह्यानें वीज उत्पन्न करण्याचीं केंद्रें उभारण्यासाठी ह्या कर्जाचा विनियोग करण्यांत यावयाचा आहे. संकल्पित वीज-निर्मिति-केंद्र मध्यप्रदेशांत उभारण्यांत यावयाचें असून त्यामध्यें उत्पन्न होणारी वीज राजस्थानांतील कांहीं प्रदेशालाहि मिळणार आहे. केंद्रांत ३०० मेगॅवॉट वीज उत्पन्न करण्यांत येणार आहे. केंद्र उभारण्यासाठी लागणारें डॉलर्सचें परदेशीय चलन कर्जांतून मिळणार आहे. केंद्रामधील विद्युत् निर्माण करणारें पहिलें यंत्र तीन वर्षांनीं चालू होईल. १९६६ च्या सुमारास केंद्रांतील यंत्रसामग्री संपूर्णपणें बसविण्यांत येईल व विजेच्या उत्पादनास पूर्णत्वानें प्रारंभ होईल.

---

### रूरकेला येथील खताचा कारखाना

रूरकेला येथें उभारण्यांत येत असलेल्या खताच्या कारखान्याचें काम वेगानें चालूं आहे. कारखाना उभारण्यासाठी लागणाऱ्या वेळाचा जो अंदाज करण्यांत आला होता त्यापेक्षा ६ ते ८ महिने लवकरच काम पूर्ण होईल असा अंदाज आहे. उभारणीच्या खर्चाबद्दल जो अंदाज करण्यांत आला होता तो बरोबर ठरला आहे. कारखान्यासाठी लागणाऱ्या परदेशीय चलनासंबंधीं जी अटकळ बांधण्यांत आली होती त्यापैकी ७५ टक्केच परदेशीय चलन प्रत्यक्ष लागलें आहे. कारखाना उभारण्याचें काम फर्टिलायझर कॉर्पोरेशन ऑफ इंडियातर्फे करण्यांत येत आहे. भारतामधील खताच्या कारखान्यांपैकी हा सर्वांत मोठा आहे.

---

### अमेरिकेची पाकिस्तानला मदत

३० जून, १९६२ अखेरपर्यंत पाकिस्तानला अमेरिकेकडून आर्थिक व तांत्रिक साह्याच्या पोटीं जवळजवळ २ अब्ज डॉलर्स मिळाले. ह्या रकमेंत कर्जाच्या व देणग्याच्या स्वरूपाच्या साह्याचा समावेश आहे. दहा वर्षांपूर्वी पाकिस्ताननें अमेरिकेशीं तांत्रिक सहकार्याचा करार केलेला आहे. त्याप्रमाणें मदत देण्यांत येत आहे. तथापि, ह्या मदतींत लष्करी मदतीचा समावेश मात्र नाहीं.


# कण आणि क्षण

लेखकः—श्री. वा. काळे

ह्या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीची छपाई पूर्ण होत आली असून पुस्तक लवकरच प्रसिद्ध होईल.

: प्रकाशक :

व्हीनस प्रकाशन,

३८१ क, शनवार पुणें २.

# सरदारगृह

मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्म-शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :–३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केट जवळ, मुंबई २.

# ओगले

★ सुंदर कांचमाल

★ टिकाऊ कंदील

★ सुबक एनॅमलच्या वस्तू

★ उपयुक्त प्रभाकर सेफ्टी स्टोव्ह


★ इलेक्ट्रिक मोटर्स

—तयार करणार—

ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड,

ओगलेवाडी, ( जि. सातारा ).

## माळेगांव सहकारी साखर कारखाना लि. चे चेअरमन



### श्री. वीरसिंह चंद्रसेन जाधवराव

मध्ययुगीन सरंजामशाही कुटुंबांत जन्मलेल्या युवराजानें सहकारी चळवळीकडे आकृष्ट व्हावें यांत 'कांहीं गुण सोन्याचे, तर कांहीं सोनाराचे' या न्यायानें बदलती सामाजिक परिस्थिति आणि शिक्षणानें उमलती मनःस्थिति या दोहोंचा समवेश करावा लागेल. तसें नसतें तर बारामतीपासून चार मैलांवर असलेल्या माळेगांव बुद्रुक या (पूर्वीच्या) जहागीर गांवचे फर्स्टक्लास संरदार कै. राजे शंभुसिंग जाधवराव यांचे नातू. श्री. वीरसिंह चंद्रसेन जाधवराव यांची माळेगांव सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन म्हणून १९६० सालीं एकमतानें निवड झालीच नसती. श्री. जाधवराव यांना माळेगांव बु॥ येथील रयत 'सरकार' म्हणून संबोधिते, तर समवयस्क त्यांना बापूसाहेब या नांवानें ओळखतात. श्री. बापूसाहेब हे मध्यम उंचीचे, हंसतमुख, प्रसन्न चेहऱ्याचे आणि गोडव्या स्वभावाचे तरूण आहेत. त्यांची जन्मतारीख १८ ऑक्टोबर १९२६; नुकतेंच त्यांनीं ३७ व्या वर्षांत पदार्पण केलें आहे.

जन्म सरदार कुळांत आणि जहागिरीच्या गांवांत. त्या वेळीं 'समाजवाद' 'समतावाद' हीं शब्दनाणीं फारशी प्रचलित नव्हतीं. त्यांचें बालपण आत्तांच्यापेक्षां सर्वस्वीं निराळ्या वातावरणांत गेलेलें. आपणांस आपल्या भावी जीवनांत जर 'आपलें' असें स्थान निर्माण करावयाचें असेल तर आपण आधुनिक शिक्षण प्राप्त करून घेतलें पाहिजे येवढेंच नव्हे तर त्यांत पारंगत होणें आवश्यक आहे, ह्या दृष्टीनें त्यांनीं आपल्या आयुष्याचें तारू योग्य दिशेनें वल्हविलें असें म्हणतां येईल. माध्यमिक शिक्षणासाठी ते पुण्याच्या मॉडर्न हायस्कूलमध्यें गेले. १९४३ सालीं ते मॅट्रिक झाले. उच्च शिक्षणासाठी त्यांनीं वाडिया कॉलेजमध्यें प्रवेश मिळविला. तेथें ते बी. एस्सी. पर्यंत शिकले. १९४७ मध्यें त्यांच्या वडिलांचें अकालीं शोचनीय निधन झाल्यामुळें त्यांना डिग्री पदरांत पाडून घेतां आली नाहीं. नाइलाजानें त्यांना पुण्याहून आपल्या गांवीं परतावें लागलें. गांवीं त्यांनीं वडिलोपार्जित शेती आधुनिक पद्धतीनें कसण्यासाठी लक्ष देण्यास सुरवात केली. त्यांना क्रिकेट आणि (शेतीविषयक पुस्तकांचें) वाचन यांची गोडी आहे. ते गाण्यांचेहि शोकीन आहेत. त्यांना शिकारीचा नाद आहे.

गांवीं आल्यावर त्यांनीं शेतीबरोबरच सामाजिक कार्याकडे लक्ष देण्यास सुरवात केली. सरदारी पोषाखाचा त्यांनीं त्याग केला. त्यांचा वैचारिक ओढा काँग्रेसकडे आहे. यथाकाल ते सहकारी चळवळीकडे वळले हें एका दृष्टीनें कालोचित असलें तरी दुसऱ्या दृष्टीनें तें आपल्या आजोबांचा तत्संबंधीं वारसा चालविणेचें होतें. त्यांचे आजोबा कै. सरदार राजे शंभुसिंग हे बाँबे सें. को. बँकेच्या पहिल्या बोर्डातील एक डायरेक्टर होते. ती जागा त्यांनीं १९ वर्षे (१९११ ते १९३०) भूषविली होती. बापूसाहेबांनीं माळेगांव येथें माळेगांव शिक्षण सेवा मंडळानें गांवांतील शिक्षणाचें कार्य हातीं घेऊन तेथें इंग्रजी शाळा सुरू केली. आतां तिचें रूपांतर हायस्कूलमध्यें झालें आहे. या मंडळाच्या कौन्सिलचे ते व्हाइस प्रेसिडेंट आहेत. स्थानिक वि. का. स. सोसायटींत ते सभासद आहेत.

१९५४-५५ मध्यें माळेगांव येथें एक सहकारी साखर कारखाना काढावा म्हणून बारामतीचे कृषितज्ज्ञ कै. दादासाहेब शेंबेकर आणि स्थानिक सहकारी यांच्या प्रेरणा-पुढाकारानें जे प्रयत्न सुरू होते त्यांत बापूसाहेब होते. ते कारखान्याचे एक प्रवर्तक सभासद आहेत. या कारखान्याचे पहिले चेअरमन कै. दादासाहेब त्यांच्या नंतर त्यांचे चिरंजीव श्री. आण्णासाहेब यांनीं तीं सूत्रें चालविलीं. पुढें १९६० च्या निवडणुकींत सभासदांनीं त्यांना निवडून दिलें आणि संचालक मंडळांतील सभासदांनीं चेअरमनपदाची माळ बापूसाहेबांच्या गळ्यांत घातली. बापूसाहेबांनीहि सभासदबंधूंनीं प्रेमानें गळ्यांत घातलेली माळ 'गळ्यांत पडली' असें न मानतां त्या मालेचे कर्तव्याच्या दृष्टीनें आणि स्थानाचें औचित्य व गांभीर्य यास धक्का लागूं न देतां संगोपन करून आपली कारकीर्द यशस्वी करून दाखविली. ही नवीन कामगिरी अंगावर घेतल्यावर त्यांनीं ती जागा शोभेची जागा न मानतां कार्यक्षेत्र म्हणूनच तिच्याकडे पाहिलें आणि कर्तव्यरत राहिले. या कामीं त्यांची अभ्यासूवृत्ति आणि गणिती दृष्टीकोण उपयोगी आला. कोणत्याहि प्रश्नाकडे ते वस्तुनिष्ठ दृष्टीनें पाहतात. ते कोठलीहि गोष्ट बेताल, बदसूर होऊं न देण्यानें साधतात. आधुनिक कारखाना म्हणजे मालक-मजूर-विग्रहाचें कोठार. तेथें केव्हां, कसा व कोठें भडका उडेल हें सांगतां येणें कठीण, पण बापूसाहेबांनीं आपल्या समंजस व समयज्ञ वागणुकीनें आणि गोडव्या स्वभावानें कारखान्यांतील मजुरविषयक प्रश्न सामोपचारानें हाताळले. शुगर इंडस्ट्रीज सेंट्रल वेज बोर्डाच्या शिफारशी महाराष्ट्रांत तरी प्रथम बापूसाहेबांच्या कारकीर्दीत माळेगांव स. सा. कारखान्याचे कार्यवाहींत आणिल्या. ५०० पैकीं फक्त २७ केसेस कन्सिलिएशन बोर्डाकडे गेल्या. कारखाना, नोकरवर्ग आणि संचालक मंडळ यांचे संबंध कारखान्यांतील साखरेप्रमाणेंच गोड राहिलेले दिसतात!

या कारखान्यांत निर्माण होणाऱ्या साखरेचा उतारा १९६०-६१ या वर्षी १२·५९ होता तर तो ६१-६२ मध्यें १२·८२ आहे. हा कारखाना उत्पादक सभासदांना त्यांच्या उसास जो भाव देतो तोहि महाराष्ट्रांतील इतर कारखान्यांच्या दरापेक्षा अधिक आहे. १९५९-६० या वर्षी हा भाव दर टनास रु. ५८/- आणि ६०-६१ या वर्षी रु. ५९/- इतका होता. कारखाना सुधारण्याच्या बाबतींत बापूसाहेबांच्या बऱ्याच योजना आहेत. हळूहळू ते त्या कार्यान्वित करीत आले आहेत. हा कारखाना १००० टनी आहे. तो १२५० टनी करण्याची त्यांच्या संचालक मंडळाची खटपट पूर्णपणें यशस्वी झाली आहे. या वाढत्या उत्पादन-शक्तीच्या कारखान्याचे चेअरमन, संचालक मंडळ, अधिकारी आणि नोकर आणि यंत्रांशीं प्रत्यक्ष काम करणारे कामगार या सर्वांच्या मनःपूर्वक सहकारांतून कारखान्याची उपयुक्तता त्याच्या उत्पादक सभासदांच्या सुखाला, आर्थिक संपन्नतेला आणि स्वावलंबनाला पोषक होवो हीच इच्छा.

### हृदयविकाराच्या निदानांत मदत करणारें यंत्र

हृदयासंबंधीच्या रोगाविषयीं विचारविनिमय करणारी ४ थी जागतिक कॉंग्रेस मेक्सिको सिटी येथें भरविण्यांत आली होती. ह्या परिषदेसाठी आलेल्या डॉक्टर मंडळींना 'हेमॅट्रॉन' नांवाचें एक नवीन वैद्यकीय उपकरण दाखविण्यांत आलें. ह्या उपकरणाच्या साह्यानें, हृदयविकार असला तर त्याचें निदान लवकर होईल असें सांगण्यांत येत आहे. उपकरणांत अणुविज्ञानाचा उपयोग करण्यांत आला आहे. बोस्टनमधील एका कंपनीनें तें बनविलें असून त्याचें वजन ७५ पौंड आहे. त्याच्या साह्यानें सशयित रोग्याच्या रक्तांत किरणोत्सारी द्रव्य टोंचतां येतें. ह्यामुळें हृदयाच्या अगर इतर रक्तवाहिन्यांना रोगाची बाधा झाली असल्यास ती चटकन् कळून येते.

### कामाची वेळ

एका मोठ्या फर्मच्या कचेरींत खालीलप्रमाणें नोटिस नुकतीच लावण्यांत आली आहे:—

"धंद्यामधील वाढत्या स्पर्धेला तोंड देण्यासाठी आम्हांला नवें धोरण स्वीकारावें लागणें भाग पडलें आहे. ह्या धोरणाची अंमलबजावणी तत्काळ सुरू केली जाईल.

"कचेरीच्या कामाची वेळ सुरू झाल्यानंतर आणि कामाची वेळ संपण्यापूर्वीं केव्हांतरी, सध्यां फराळासाठी जो वेळ खर्च होतो त्याला बाध येणार नाहीं अशा रीतीनें, करमणुकींत व्यत्यय येऊं न देता, चहासाठी लागणाऱ्या वेळांत कपात न करतां, गप्पागोष्टींत फारसा खंड पडूं न देता, क्रिकेटच्या मॅचची चर्चा फारशी कमी न करतां, प्रत्येक नोकरानें थोडीतरी वेळ बाजूला राखून ठेवावी. तिला 'कामाची वेळ' असें संबोधण्यांत येईल."


दातांच्या स्वच्छतेसाठी

☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆




बेडेकर

मसाले, लोणचीं व पापड

आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.


वापरून पाहा.

मुगभाट, मुंबई ४.

शाखाः ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

*Make doubly sure by fitting*



MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

GADRE BANDHU

MADHAVNAGAR (S.R.)

INDIA

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००

बचतीच्या आकर्षक योजना

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर २॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | " ३। " |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | " ५ " |

*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.